नांदेड जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास

(कालखंड २०१४-१५ ते २०२४२५)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव विज्ञान विध्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पी.एच.डी. पदवी संपादन करण्याकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा.

▪ संशोधक ▪

शरद सुभाष खंदारे

▪ मार्गदर्शक ▪

प्रा. डॉ. टी.एम.गुरनुले

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहुर जि. नांदेड

▪ संशोधन केंद्र ▪

सामाजिकशास्त्रे विद्या संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डिसेंबर २०२४

नांदेड जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास

(कालखंड २०१४-१५ ते २०२४-२५)

गोषवारा :

मानवी जीवनामध्ये आर्थिक नियोजनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. मानवाचे भविष्य काळातील जीवन हे संपूर्ण अंधारमय आहे. त्यामुळे पुढील जीवनामध्ये येणाऱ्या आर्थिक समस्या सोडवण्यासाठी मानवाला आर्थिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशातील वाढत्या लोकसंख्येची भूक ज्या प्रकारे अन्न धाण्यातून भागविले जाते. त्याप्रमाणे दूध व दुग्धजन्य पदार्थ मांस, फळे, अंडी, मासे इत्यादी पदार्थातूनही अन्नधान्याची गरज भागवली जाते. १९६०-६२ च्या दशकामधील देशातील अन्नदानाच्या बाबतीमध्ये मोठ्या प्रमाणात कमतरता निर्माण झाली होती. याच काळामध्ये मोठ्या प्रमाणात भूकबळीचा आकडा वाढला होता. देशातील जनतेला एक वेळचेच जेवण मिळत होते. या काळात देश अन्नदानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण नव्हता अमेरिका, रशिया अशा देशांवर अवलंबून राहावे लागत. परंतु १९६६-६७ या काळात सरकारने आपले धोरण बदलले आणि देशाला अन्न धान्याच्या बाबींमध्ये स्वयंपूर्ण बनवण्यासाठी कृषी क्षेत्रात अमुलाग्रह क्रांती घडवून आणली. त्या क्रांतीचे नाव हरितक्रांतीच्या माध्यमातून कृषी क्षेत्रांचा विकास झाला गहू हायब्रीड तांदूळ मका यासारख्या धान्यांच्या बियाण्यांमध्ये बदल करून उच्च प्रतीचे उत्पादन वाढवण्यावर जोड दिला. पुढील काळात डॉ. वर्गीस कुरियन यांच्या अध्यक्षतेखाली देशात श्वेतक्रांती घडून आणली या क्रांतीच्या माध्यमातून देशांना दूध उत्पादनामध्ये अमेरिका, रशिया, फ्रान्स, चीन डेन्मार्क या देशांच्या यादित बसविले आहे. कोणत्याही देशांचा खऱ्या अर्थाने आर्थिक विकास करण्यासाठी त्या देशातील जनता सक्षम सुदृढ निरोगी असावी यासाठी त्यांना योग्य आहार, आरोग्य, शिक्षण मिळणे आवश्यक आहे. दूध हा पूर्ण अन्न आहे.

दुध आहार दृष्ट्या प्रत्येक व्यक्तीला प्रतिदिन ३०० मिली दुधांची आवश्यकता असते. दुधामध्ये पाणी, करबोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्वे असल्यांमुळे हे पूर्ण अन्न आहे. या दृष्टिकोनांतून दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास महत्वाचा आहे. दुग्ध व्यवसाय हा शेतीशी आधारित जोड व्यवसाय म्हणून केला जातो. शेती उत्पादनांमध्ये दुग्ध व्यवसायामुळे शेती उत्पादनामध्ये भर पडते. या दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय करताना येणाऱ्या समस्या उदा. जनावरांची आरोग्य, निवारा, खाद्य, स्वच्छ पिण्याचे पाणी या सर्व बाबींमध्ये येणाऱ्या आर्थिक समस्यातून शेतकऱ्यांना हा दुग्ध व्यवसाय उभा करावा लागतो. दुधाचे वितरण करणे, संकलन करणे, वाहतुकीची साधने, रस्ते, दूध संकलन केंद्र अशा अनेक समस्या निर्माण होतात. या समस्यांची निवारण करून शेतकरी कशा पद्धतीने हा व्यवसाय करतो. या सर्व बाबींचा आर्थिक समस्यांचा मुद्देसूद अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

प्रस्तावना :

नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या छत्रपती संभाजीनगर या प्रशासकीय विभागामध्ये आहे. याच जिल्ह्यांला संस्कृत कवीचा जिल्हा म्हणून ओळखले जाते. नांदेड शहर हे जिल्ह्यांचे मुख्यालय असून ते गोदावरी नदीकाठावर वसलेले शहर आहे. गोदावरी नदी काठावरच असलेल्या प्राचीन किल्ल्यांच्या नावावरून या शहराला प्रथम नंदागिरी उर्फ नंदिग्राम या नावाने व नंतर या नावांचा कालांतराने अपभ्रंश होऊन नांदेड हे नाव पडले आहे नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण १६ तालुके आहेत ते पुढील प्रमाणे १) माहूर २)किनवट ३) हदगाव ४) मुखेड ५) हिमायतनगर ६) भोकर ७) अर्धापूर ८) देगलूर ९)बिलोली १०) धर्माबाद ११)) नायगाव १२) उमरी १३)मुदखेड १४)कंधार १५)लोहा १६)नांदेड या १६ तालुक्यांचा समावेश होतो.

महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेला नांदेड जिल्हयांचे स्थान असून या जिल्हयांच्या सीमा कर्नाटक व तेलंगणा राज्यांना लागतात. नांदेड जिल्हयांचे भौगोलिक क्षेत्रफळ १०,५२८ चौरस किलोमीटर आहे. तर लोकसंख्या ३३,५६,५६६ इतकी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण ७६.९४% आहे. व लोकसंख्येची घनता ३२२ प्रति चौरस किलोमीटर आहे. नांदेड जिल्हयांला ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेला आहे. या सर्व दृष्टिकोणांतून नांदेड जिल्हयांतील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे. नांदेड जिल्हयांच्या ग्रामीण व शहरी भागातील दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी यांचा तुलनात्मक अभ्यास करणे. त्यांना मिळणाऱ्या दुधाच्या किंमतींचा व जनावरावर किंवा दुग्ध संकलन डेरी केंद्रावर दूध देण्यांपर्यंत येणाऱ्या उत्पादन खर्च यांचा अभ्यास करणे. प्रस्तुत संशोधन विषयांची पूर्व माहिती नसल्यांमुळे संशोधनांच्या दोन्ही पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयांतील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारी योजना किंवा काही सरकारी अनुदान यांचा आर्थिक लाभ मिळतो का? यांचाही अभ्यास करण्यात येईल. आज देशांमध्ये मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसायांतील दुधाच्या उत्पादनांमध्ये प्रगती झाली असताना अजूनही नांदेड जिल्हयांमध्ये या दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना येणाऱ्या आर्थिक समस्यांमुळे या दुग्ध व्यवसायांचा फारसा विकास झाला नाही उदा. जनावरांच्या आरोग्यांची सुविधा, जनावरांचा निवारा, खाद्य, स्वच्छ पाणी, वाहतुकीचे रस्ते, दुग्ध संकलन केंद्र या समस्या आहेत. यादृष्टिकोनातून हा संशोधन विषय महत्त्वाचा आहे. या विषयावर अद्याप कोणतेही संशोधन झालेले नाही. म्हणुन हा विषय निवडला आहे. तसेच हा दुग्ध व्यवसाय कृषी आधारित जोड व्यवसाय असल्यांमुळे या विषयातील आवड आणि उत्सुकता यामुळे हा विषय निवडण्यात आला आहे.

दुग्धव्यवसाय म्हणजे काय? :

१) दुग्ध व्यवसाय दुधाचे उत्पादन करणे. त्यावर योग्य ते संस्करण करून त्यांची विक्री करणे इत्यादी बाबीचा समावेश दुग्ध व्यवसाय मध्ये होतो. दुधाचे उत्पादन वितरण खरेदी करणे यात दुधाळ जनावरांचे प्रजनन खाद्य दूध काढणे व देखभाल जनावरांची देखभाल करणे हे महत्त्वाचे आहे.

२) दुग्ध व्यवसाय म्हणजे गुरेढोरे मुख्यत दुग्धजन्य गायी आणि म्हशीच्या काळजी आणि आहारातून दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनासाठी केला जाणारा शेतीचा प्रकार होय. यामध्ये दुग्धजन्य प्राण्याचे प्रजनन संगोपन आणि प्रक्रिया यांचा समावेश होतो. दुग्ध व्यवसाय हा प्राथमिक क्षेत्रात येतो.

३) शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय हा पूर्वीपासूनच परंपरागत चालत आलेला महत्त्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसायासाठी प्रामुख्याने संकरित गायी देशी गायी गावठी दुधाळ गायी पाळल्या जातात.

संशोधन समस्या निवडीचे कारणे :

१) दुग्ध व्यवसायाबद्दल व दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या विषयी असलेली कुतूहलता आणि जिज्ञासा यामुळे हा विषय निवडण्यात आलेला आहे.

२) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसायांची आर्थिक प्रगती अभ्यासणे.

३) नांदेड जिल्हा हा दूध व्यवसायाला अनुकुल असल्यांमुळे नांदेड जिल्हयांची दुग्ध व्यवसायांतील आर्थिक स्थिती अभ्यासणे. व नांदेड

जिल्हयातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारी योजना कोणत्या प्रमाणात मिळतात व या योजनेमुळे दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये सरकारी योजना मुळे आर्थिक विकास झाला आहे का? या कारणासाठी विषयांची निवड करण्यात आली आहे.

५) दुग्धव्यवसायातील शेतकऱ्यांच्या बदलांचा अभ्यास करणे.

६) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नामध्ये वाढ झाली का? हे अभ्यासणे,

७) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसायासाठी पायाभूत सुविधांचा अभाव आहे. उदा. रस्ते, वाहतूक ,जनावरांची आरोग्य, यांचा अभ्यास करण्यासाठी विष्याची निवड झाली.

८) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसाय वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनांमार्फत उपक्रम राबवले जातात का? हे अभ्यासणे.

इत्यादी कारणांचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) नांदेड जिल्हयातील कृषीवर आधारित दुग्धव्यवसायांचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसायाशी संबंधित शासकिय योजनाचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्याचा अभ्यास करुन त्यावार उपाय सुचवणे.

५) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसायामुळे निर्माण होणाऱ्या नवीन रोजगार संधीचा अभ्यास करणे.

६) दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक कार्यक्षमता सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

७) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसायामधील मूलभूत घटकाचा अभ्यास करणे उदा. जनावरांचे संगोपन, दुधाळजनावरांना होणारे आजार ,जनावरांचा निवारा, खाद्य इ. घटकांचा अभ्यास करणे.

८) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारना घडवून येण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

संशोधन विषयांची गृहितके :

१) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या आहेत.

२) नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील दुग्धव्यवसाय मागास आहे.

३) नांदेड जिल्हयातील दुग्धव्यवसाय करणारे शेतकरी असंघटित आहेत.

४) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शासकीय योजनेमुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

५) नांदेड जिल्हयातील दुग्ध व्यवसायात रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन विषयांच्या अनुषंगाने संशोधन करीत असताना विषयांची पूर्व माहिती उपलंब्ध नसल्यामुळे तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधन पद्धतीचा वापर केल्यास सलग अनुमान निष्कर्ष तंतोतंत येण्यास मदत होणार आहे. संशोधन पद्धती ही यशस्वी संशोधन प्रबंधाची पायाभरणी ठरू शकते. योग्य निष्कर्षांच्या जवळपास पोहोचण्यासाठी प्रभावी माध्यम म्हणून संशोधन पद्धतीकडे पाहिले जाते. कोणत्याही विषयातील संशोधन हे शास्त्रशुद्ध होणे आवश्यक असतो. त्यामुळे प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारित आहे.

अ) प्राथमिक साधने :

नांदेड जिल्ह्यांतील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या विषयी प्राथमिक माहिती नसल्यांमुळे प्राथमिक माहिती प्रत्यक्ष भेट देऊन घेतली जाईल. संशोधन स्थळांचे निरीक्षणाच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाईल. दुग्ध व्यवसायातील संबंधित शेतकऱ्यांच्या प्रश्नावली संबंधित घटकाची मुलाखत यांच्या माध्यमातून आकडेवारी गोळा करणार आहे.

ब) द्वितीय साधने :

हा द्वितीय स्त्रोत अत्यंत महत्त्वाचा आहे द्वितीय स्रोतांचे दोन प्रकार पडतात.

१) प्रकाशित साधने :

सरकारी अहवाल, दुग्ध मंत्रालय, दुग्ध व्यवसायाशी संबंधित जिल्हा प्रशासनाची वार्षिक अहवाल, पुस्तके, वृत्तपत्र, मासिक, कृषी विद्यालयांची पुस्तके इत्यादी.

२) अप्रकाशित साधने

सरकारी नोंदी आणि प्रबंध या अप्रकाशीत स्त्रोताची ही माहिती संकलित करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

१) दुग्ध व्यवसाय वाढविण्यांसाठी दुधाळ जनावरांची पैदास वाढविणे. जनावरांच्या आरोग्याची व्यवस्था करणे, जनावरांसाठी योग्य निवारा, स्वच्छ पीण्याचे पाणी दूध संकलन केंद्र यासारख्या घडकांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

२) नांदेड जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायकरणांऱ्या शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करून उपाय सुचविणे.

३) ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध करण्यासाठी या दुग्ध व्यवसायांचा अभ्यास करून ग्रामीण भागातून रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर थांबून ग्रामीण भागाचा समतोल विकास कसा केला जाईल. या दृष्टिकोनातून हा विषय महत्त्वाचा आहे.

४) भारतासारख्या बहुसंख्य लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये अन्नधान्याची गरज दूध आणि दुग्धजन्य पदार्थातूनही भागविले जाते. त्यामुळे नांदेड जिल्ह्यांतील दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. म्हणुन प्रस्तुत संशोधन विषयांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

५) दुग्ध उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रथम दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सक्षम असावी लागते. त्यांना दुग्धव्यवसायात येणाऱ्या समस्या दूर करण्यांसाठी नवीन उपाय सुचविण्यासाठी सदर विषय महत्त्वाचा आहे.

यामुळे नांदेड जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचा विकास होईल दुग्ध उत्पादनातही वाढ होईल रोजगारांच्या संधी निर्माण होतील यामुळे या विषयाचे महत्त्व आहे.

संशोधन विषयांची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अभ्यास क्षेत्र संपूर्ण नांदेड जिल्हा आहे. यामध्ये दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी १६ तालुक्यांचा अभ्यास हा तुलनात्मक पद्धतीने केला जाणार आहे. यामध्ये दुधाचे दर, वातावरण, नदी खोऱ्यातील शेतकरी, कोरडवाहू शेती आधारित दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी अशा विविध घटकांचा यात अभ्यास होणार आहे.

संशोधन विषयांची मर्यादा :

प्रस्तुत संशोधन "नांदेड जिल्ह्यातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितींचा अभ्यास (कालखंड २०१४-१५ ते २०२४-२५) मर्यादित आहे. संशोधन कार्य करीत असताना त्या संशोधनाला काही मर्यादा असतात. कोणतेही संशोधन कार्य मर्यादित क्षेत्रात व मर्यादित वेळेत पूर्ण होणे अपेक्षित असते त्या दृष्टिकोनातून सदर संशोधन कार्यांची मर्यादा नांदेड जिल्ह्यां पुरती मर्यादित आहे. आणि (**कालखंड** १०१४-१५ ते २०२४-२५) पर्यंत मर्यादित आहे.

संशोधन विषयांचा नमुना निवड :

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना या विषयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण नांदेड जिल्हा आहे. संशोधन विषयांची पूर्व माहिती उपलब्ध नसल्यामुळे प्रत्यक्ष माहिती घ्यावी लागते. यासाठी वेळ, श्रम, पैशांचा अपव्यय टाळण्यासाठी नमुना

निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधन विषयांचा नमुना तिनिधिक स्वरूपांचा, वस्तुनिष्ठता, पर्याप्त आकार व्यावहारिक अनुभवावर आधारित नमुना निवड असावा इत्यादी गुणांवर आधारित नमुना निवड असणार आहे. संबंधित संशोधनामध्ये साधा नमुना निवड पद्धतींचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक तालुक्यांतील ठराविक गावातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे यावरून संपूर्ण नांदेड जिल्ह्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन विषयांच्या तथ्याचे विश्लेषण आणि निर्वाचन :

सामाजिक संशोधन पद्धती ही शास्त्रीय स्वरूपाची असते. सामाजिक संशोधन विश्लेषण म्हणजे समस्या निर्धारण झाले. की त्या विषयासंबंधी तथ्य किंवा माहिती गोळा करावी लागते. आणि संकलित केलेल्या माहितीला अर्थ प्राप्त करून देण्याचे कार्य माहितीचे विश्लेषण आणि निर्वाचन याद्वारे केले जाते. संबंधित विषयाची तथ्य संग्रहित करून त्यांचे क्रंमबद्ध मांडणी करणे. मिळविलेल्या तथ्यांचे योग्य ते सारणीकरण करणे. तथ्यावर संस्करण करणे. तथ्याला विश्लेषण योग्य बनवणे. गृहीत कृत्यांची पडताळणी करणे. त्यांच्या आधारे योग्य निष्कर्ष मांडणे, अनावश्यक तथ्यांना वगळणे. सारणीकरण करणे. इत्यादी कार्य माहितीचे विश्लेषण व निर्वाचन याद्वारे करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रचना :

सदर संशोधन प्रबंधात पुढील प्रकरणाचा समावेश असणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

सदर प्रकरणामध्ये विषयांचे महत्त्व, अभ्यास पद्धती, संशोधन उद्दिष्टे, गृहीतके, आणि संशोधनाची व्याप्ती मर्यादा व पूर्ण संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे: संशोधन साहित्यांचा आढावा घेणे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये सदरील संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा घेताना अध्यन विषयाशी संबंधित आंतराष्ट्रीय पातळीवरील, राष्ट्रीय पातळीवरील, स्थानिक पातळीवरील संशोधन साहित्याचाही संक्षिप्त आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तीसरे : नांदेड जिल्हयांची ओळख/ ष्टिक्षेप

नांदेड जिल्हयांचा सामाजिक व आर्थिक घटकांचा अभ्यास करणे. कृषी क्षेत्र, नांदेड जिल्हयाची भौगोलिक व आर्थिक वैशिष्ट्ये, लोकसंख्या इत्यादी घटकाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे : दुग्ध शासकिय योजना आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयांत दुग्ध व्यवसायासाठी शासनाने कोणत्या योजना राबविल्या आहेत. या योजनेच्या माध्यमातून झालेले फायदे व तोटे यांचा अभ्यास करण्यात येईल. उदा. गायी व म्हशीची योजना दुग्ध व्यवसायासाठी दिले गेलेले प्रशिक्षण उपक्रम पशुप्रदर्शन यासारख्या योजनाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : माहितीचे संकलन व आशय विश्लेषण

सदर प्रकरणांमध्ये नांदेड जिल्ह्यातील (४००) दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाखती, घेऊन प्रश्नावली दवारे संग्रहित केलेल्या माहितीच्या आधारे २०१४-१५ ते २०२४-२५ या काळातील दुग्ध उत्पादन खर्च व मिळणारी किंमत यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल. दुधाळ जनावरावरील खर्च उदा. जनावरांच्या आरोग्यावरील खर्च, कोरोना काळातील दुधाचे दर, अशा घटकावरील उत्पादन खर्च व किंमत यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रत्येक प्रकरणाचा सारांश घेऊन नंतर ठळक निष्कर्ष मांडण्यात येणार व त्यावरील उपाय योजना करण्यात येईल.

संदर्भसूची :

१) डॉ. कऱ्हाडे. बी. एम. (२००६) शास्त्रीय संशोधन पद्धती.

पिंपळापुरेॲंड कंपनी पब्लिशर्स नागपूर.

२) कुलकर्णी व ढमढेरे (२००७) अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती.

डायमंड प्रकाशन पुणे.

३) डॉ. आगलावे प्रदीप (२००८) सामाजिक संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्र.

श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

४) डॉ. बुरकुले सो. स. (२००८) आदर्श दुग्ध व्यवसाय. सांकेत प्रकारशन पुणे.

५) प्रा. डॉ. दायमा. ब्रिजमोहन. रा. (२०१२) सेट नेट मार्गदर्शक संशोधन विषयक दृष्टिकोन. विद्याभारती प्रकाशन लातूर.

६) श्री भोंगे कृष्णा (भा. .से.) (२०१५) परिपूर्ण मार्गदर्शिका कृषी घटक. के. सागर पब्लीकेशन पुणे.

७) डॉ. कदम बापूराव रघुनाथ (२०१६) दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती. प्रकाशन सातारा.

८) डॉ. कोळंबे रंजन (२०१८) भारतीय अर्थव्यवस्था. भागीरथ प्रकाशक पुणे.

९) अन्नदाते शशिकांत व अन्नदाते स्वाती (२०१८) संशोधन पध्दती सेट, नेट, पेट मार्गदर्शक. के. सागर प्रकाशन पुणे.

१०) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१८) नांदेड जिल्हा.

११) मार्कडे नितीन (२०२०) शाश्वत दुध व्यवसायाचे तंत्र सांकेत प्रकाशन पुणे

१२) मार्कडे नितीन (२०२२) फायदेशी दुध व्यवसाय. सांकेत प्रकाशन पुणे

१३) https//nanded.gov.in

१४) www.shodha.infilbnet.ac.in

१५) www.bookvishwa.com

संशोधक

शरद सुभाष खंदारे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.टी.एम. गुरनुले

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री रेणुकादेवी महाविद्यालय माहुर जि.नांदेड